केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यात जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी माता व नवजात अर्भकांना शासकीय रुग्णालयातून विनाशुल्क सेवा देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक- जशिका २०११/प्र.क्र. ३५२/आरोग्य-३
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २६ सप्टेंबर, २०११.

वाचा : १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक- जीरुफी १०००/प्र.क्र. ९०/आरोग्य ३, दिनांक १०.७.२००१.
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक- एमएजी २००४/प्र.क्र. २०/आरोग्य ३, दिनांक २१.७.२००४.
३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक- जीरुफी २०००९/प्र.क्र. २३९/ आरोग्य-३, दिनांक २५.८.२००९.
४) आयुक्त (कुटुंब कल्याण) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान यांचे पत्र क्रमांक- राआसो/जशिसु/मोफत सेवा/१५३१८/११, दिनांक २८.७.२०११.

प्रस्तावना : सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक-१ येथील शासन निर्णयान्वये शासकीय रुग्णालयातून देण्यात येणाऱ्या विविध रुग्णसेवेकरीता आकारण्यात येणारे शुल्क निश्चित केलेले आहे. या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या एकूण १४ संवर्गातील व्यक्ती आणि लाभधारकांना रुग्णसेवा शुल्क भरण्यापासून सूट देण्यात आली आहे. या १४ संवर्गांनंतर संदर्भाधिन शासन निर्णय क्रमांक-२ अन्वये "राज्यातील वरीष्ठ नागरिक" या संवर्गाचा अनुक्रमांक १५ येथे तर संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक-३ अन्वये "राज्यातील अधिस्विकृतीधारक पत्रकार" या संवर्गाचा अ.क्र. १६ येथे समावेश करण्यात आला आहे.

शासन निर्णय : केंद्र शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे राज्यामध्ये "जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम" राबविण्यासाठी संदर्भाधीन क्रमांक-१ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ येथील संवर्गामध्ये अ.क्र.१७ येथे पुढील संवर्गाचा समावेश करण्यात येत आहे :-

**अ.क्र. १७ :- "गरोदर माता आणि ० ते ३० दिवस वयाची नवजात अर्भके" :-**

गरोदर मातांना नोंदणी ते बाळंतपण व त्यानंतर ६ आठवडे व नवजात अर्भकांना ० ते ३० दिवस पर्यंत नोंदणी शुल्क, विविध चाचण्या, उपचार, औषधे, आहार आणि घर ते रुग्णालय, रुग्णालय ते रुग्णालय व रुग्णालय ते घरी मोफत वाहतूक सेवा इत्यादी सुविधा मोफत पुरविल्या जातील.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-६४८/११/व्यय १३, दिनांक २२.९.२०११ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( सुहास रा. चव्हाण )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मा. मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
अपर मुख्य सचिव (आरोग्य) यांचे स्वीय सहाय्यक.
सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
आयुक्त (कुटुंब कल्याण) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान संचालनालय, मुंबई.
सर्व सहसंचालक, आरोग्य सेवा.
सर्व उप संचालक, आरोग्य सेवा.
सर्व जिल्हा शल्य चिकित्सक.
सर्व आरोग्य अधिकारी.
सर्व वैद्यकीय अधिक्षक/ वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालये.
वित्त विभाग (कार्यासन ), मंत्रालय, मुंबई.
सार्वजनिक आरोग्य विभाग (सर्व कार्यासने)
निवडनस्ती (आरोग्य ३).

**Ministry of Health & Family Welfare**
**Government of India**
**MH-Division**
*****

**Office Memorandum**

**Nirman Bhawan, New Delhi**
**Dated the 20th February, 2013**

**Subject: Approval of extended entitlements to mother and child under JSSK –reg.**

Under the National Rural Health Mission, Janani Shishu Suraksha Karyakaram (JSSK) had been launched on 1st June, 2011, to eliminate any out of pocket expenses for pregnant women delivering in public health institutions and sick newborns accessing public health institutions for treatment till 30 days after birth. The aim of the initiative is to achieve zero out of pocket expenditure by the beneficiaries.

A decision has now been taken for guarantee of free services in the 12th Five Year Plan, with no out of pocket expenditures for all pregnant women coming for delivery including antenatal and postnatal complication in public institution and sick newborns and infants accessing public health system. In view of the above, the States need to reflect the budgetary requirement accordingly.

Yours sincerely,

(signature)

**(Dr. H. Bhushan)**
**DC (MH)**

**To**

- **Principal Secretaries/Secretaries and Mission Directors of all the States and UTs**
- **Director Health Services and Program nodal officers of all the States and UTs**

**Copy for information to:**

- **AS & MD,**
- **JS (RCH),**
- **JS (NRHM)**
- **All DCs, Dir (NIHFW) and Dir NHSRC.**

| राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे<br>महाराष्ट्र राज्य | | |
|---|---|---|
| अतिरिक्त संचालक<br>दूरध्वनी क्रमांक (वै) -<br>कार्यालय दूरध्वनी क्र. - | २६०५८९९६ (वै)<br>२६०५८७३९ (का)<br>२६०५८१३९ (का)<br>२६०५८४७६ (का) | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटूंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटूंब कल्याण भवन, राजाबहादूर मिलरोड, रेल्वेस्टेशनच्या मागे, पुणे ४११ ००१.<br>फॅक्स नं.- ०२० - २६०५८७६६ / २६०५८२१८ / २६०५८१०९<br>Email ID : |
| आरोग्य सेवा | | जा.क्र.राकुकका/जशिसुका/कार्यकक्षा वाढवण्याबाबत/ कक्ष-१०(ब)/न.क्र. / /२०१३,<br>दिनांक - /०९/२०१३ ६५६७४-६२२ |

प्रति,
उपसंचालक,
आरोग्य सेवा, परिमंडळ .............सर्व

**विषय : जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत लाभार्थ्यांची कार्यकक्षा वाढविणेबाबत...**

**संदर्भ :१) केंद्र सरकार कडील दि. २०.०२.२०१३ रोजीचे कार्यालयीन ज्ञापन.**
**२) मा.आयुक्त, कुटुंब कल्याण तथा अभियान संचालक राग्राआअ यांचेकडील पत्र क्र. राआसो/EMS/RT/२६७२६-८३६, दि. ०८.०७.२०१३.**

उपरोक्त विषय व संदर्भ क्र. २ अन्वये सर्व जिल्हयास जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत लाभार्थ्यांची कार्यकक्षा वाढविण्या संदर्भात कळविण्यात आले होते. यानुसार गरोदर महिलेस तसेच प्रसुती दरम्यानच्या काळात व प्रसुती नंतरच्या काळात (० ते ४२ दिवस) गुंतागुत निर्माण झाल्यास तसेच एका वर्षापर्यंतच्या सर्व आजारी बालकांस सर्व प्रकारच्या सेवा व मोफत संदर्भ सेवा देण्यात यावी असे आदेश देण्यात आले होते.

तथापि असे आढळून आले आहे की, आपल्या कार्यक्षेत्रातील आरोग्य संस्थांमध्ये लाभार्थ्यांची कार्यकक्षा वाढवण्याबाबतची कार्यवाही दिसून येत नाही. या बाबत वरीष्ठांनी नाराजी व्यक्त केली आहे.

तरी आपण आपल्या कार्यक्षेत्रातील आरोग्य संस्थामधील गरोदर महिलेस प्रसुती दरम्यानच्या काळात व प्रसुती नंतरच्या काळात (० ते ४२ दिवस) गुंतागुत निर्माण झाल्यास तसेच एका वर्षापर्यंतच्या सर्व आजारी बालकांस जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारच्या सेवा व मोफत संदर्भ सेवा दिल्या जातील याची दक्षता घ्यावी.

Approved on E file

अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा,
कुटुंब कल्याण माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे.

प्रत माहिती स्तव व कार्यवाहीस्तव
१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ..................(सर्व)
२) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद .................. (सर्व)
३) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय .................. (सर्व)

प्रत माहितीस्तव सादर
१) मा. आयुक्त (कुक) तथा संचालक , रा.ग्रा.आ.अ., मुंबई.
२) मा. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन, मुंबई.

Government of Maharashtra

# National Rural Health Mission

State Health Society, Public Health Department Maharashtra

Vikas Kharage I.A.S.
**Commissioner (Family Welfare) & Mission Director (National Rural Health Mission)**
Tel. : 022-2262 0235
Fax : 022-2264 2955
E-mail : mdnrhm.mumbai@gmail.com

NRHM
महाराष्ट्र शासन

"Arogya Bhavan", 3rd Floor,
St. George's Hospital Compound,
P.D'melo Road, Mumbai - 400 001.
www.maha-arogya.gov.in

37215-17

D.O. No.SHSM\JSSK Services-Guide\ \12
Date : 4th September 2012

**Sub: Implementation of Janani Shishu Suraksha Karyakram (JSSK) in Medical College Hospitals**

**Ref: Marathi Letter No.Paripatrak/Atitatkal – Savaishivasa / NRHM/ pravanabaa- Nishulkseva/4-A dt: 30th May**

The state is committed to attain reduction in MMR & IMR as per goals set by GoI. As per Registrar General Government of India Survey, for period 2007-09, Maternal Mortality Ratio (MMR) of the State is 104 per 100,000 Live births. As per SRS 2010, IMR of the state is 28 per 1000 live births. The state has to attain MMR of 70 & IMR of 16 by 2014. As per Govt. Resolution dated 26th Sep.2011 Janani Shishu Suraksha Karyakram has been inaugurated from 7th Oct. 2011 in all districts of Maharashtra. It is being implemented in all health institutions under Public Health Department.

As per your reference letter addressed to all Deans, JSSK is being implemented in Medical College Hospitals. In order to further streamline and provide support from NRHM, it is to inform you that Government Medical College Hospitals are being provided support in following areas from funds received under NRHM.

Under JSSK program, following support will be given by the Public Health Department under National Rural Health Mission.

1. Additional drugs and consumable.
2. Additional referral transport facility.

For the remaining components under JSSK viz. free diet, free diagnostic tests and blood transfusion services, support will be provided by the respective government medical college hospitals only.

The details of the each of the component under JSSK and the responsibility for providing these services are as follows:

1. **Providing drugs and consumable:** All the medical college hospitals will provide drugs and consumable free of cost to all JSSK beneficiaries from their existing funds and from the supply of Medical Education Department. Whatever is the excess demand due to increased JSSK beneficiaries, that much quantity of drugs and consumable will be made available by Public Health Department under NRHM from this financial year 2012.
2. **Providing free referral transport:** Under JSSK, free referral transport for pregnant mothers and sick neonates from home to institution, institution to another institution and drop back from institution to home will be provided. It is required that every medical college hospital will use its existing ambulance services for this purpose. Additional ambulances / vehicles will be made available by Civil Surgeon to each of the medical college hospital as per the demand. Head of Department of OBGY of the respective medical college hospital should be appointed as Nodal Officer to organize the referral transport to JSSK beneficiaries. The separate register should be maintained for recording the referral transport services provided under JSSK.

   Every district call center is provided with 102 toll free number for JSSK beneficiaries to call for the referral transport services. The Civil Surgeon of the concerned district and the Dean, Medical College Hospital along with the HOD (OBGY) will do micro planning for providing referral transport to the JSSK beneficiaries.
3. **Provision of Free Diet:** All the medical college hospitals should be instructed to provide free diet to all JSSK mother beneficiaries from the existing funds available with them.
4. **Providing Free Diagnostics and Blood Transfusion Services:** As part of free entitlements to pregnant mothers and sick neonates, it is expected that all diagnostic tests such as sonography, radiography, routine and specialized lab investigations are required to be provided free of cost to all JSSK beneficiaries.

Similarly blood transfusion facility for needy women and sick neonates should also be provided free of cost. In this regard suitable instructions may be given at your level to all government medical college hospitals to provide these services free of cost to all JSSK beneficiaries.

5. **Reporting of performance under JSSK:** State is monitoring deliveries, referral transport services provided, diet provided to JSSK beneficiaries on daily and monthly basis. One Nodal person in OBGY. Department in all medical college hospitals should be designated to report daily and monthly to Civil Surgeon. The prescribed format will be given to medical college hospitals by the concerned Civil Surgeon.
6. **Display Boards:** Civil Surgeon will provide Flex-Boards giving details of entitlements under JSSK for display in ANC, Gynec and Pediatric-OPD and wards, labour room etc.

I wish suitable instructions to all Deans of Government Medical Colleges will be issued at your earliest so that beneficiaries from the state are not deprived of the entitlements and the scheme is implemented in true spirit.

With Best Wishes,

Yours

sd/-

(Vikas Kharage)

To

Dr. P. H. Shingare
Director, Medical Education & Research,
Mumbai

Copy submitted to:

1. The Additional Chief Secretary, Public Health Department, Mantralaya, Mumbai.
2. The Secretary, Medical Education & Drugs Department, Mantralaya, Mumbai.

(Vikas Kharage)

NRHM CELL
ISSUED
Date : 3/9/12

# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
## महाराष्ट्र राज्य

बेटी बचाओ save the girl child

| अतिरिक्त संचालक | | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटूंब कल्याण, |
|---|---|---|
| दूरध्वनी क्रमांक (वै) - | २६०५८९९६ (वै) | माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटूंब कल्याण |
| कार्यालय दूरध्वनी क्र. - | २६०५८७३९ (का) | भवन, राजाबहादूर मिलरोड, रेल्वेस्टेशनच्या मागे, |
| | २६०५८१३९ (का) | पुणे ४११ ००१. फॅक्स नं.- ०२० - २६०५८७६६ / |
| | २६०५८४७६ (का) | २६०५८२१८ / २६०५८१०९ |
| | | Email ID : rch.jsy@gmail.com |
| आरोग्य सेवा | | जा.क्र.राकुकका/ जेएसएसके/ महानगरपालिका अंमलबजावणी /कक्ष १०/ न.क्र ३१९/ /२०१२ |
| | | दिनांक : ६/११/२०१२ L093L-208 |


प्रति,
वैद्यकिय आरोग्य अधिकारी
महानगरपालिका .......... (सर्व)

विषय :- महानगरपालिका कार्यक्षेत्रात जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमाची अंमलबजावणीबाबत..

संदर्भ :- मा. आयुक्त महानगरपालिका यांना मा. आयुक्त (कुक) व संचालक राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान यांच्या कडील पत्र क्र.एसएचएसएम/पीओ आरसीएच/जेएसएसके/ ५४२४१ -६७/१२ दि.५/११/२०१२

जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमाची राज्यात ७ ऑक्टोबर २०११ पासून अंमलबजावणी सुरु झाली आहे. सदरच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्रशासन यांच्या शुभ हस्ते झाली आहे. सदरच्या कार्यक्रमामध्ये गरोदर माता व ३० दिवसा आतिल नवजात आजारी बालकाला सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा, प्रयोग शाळा चाचण्या तसेच आहार व मोफत वाहतुकीची सेवा उपलब्ध करुन देणेसाठी शासन कटीबध्द आहे.

या वर्षी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत औषधे व साहित्य पुरवठा करण्यात येणार आहे. तसेच मोफत वाहतुकीची सेवा ही उपलब्ध करुन देण्यात येणर आहे. या व्यतिरिक्त संबंधीत लाभार्थींना मोफत आहार, प्रयोगशाळा चाचण्या व रक्त पुरवठा याबाबत महानगर पालिकांनी पुरवठा करावयाचा आहे.

नगर विकास विभाग मंत्रालय कडील पत्र क्र. बैठक-२०११-प्र.क्र.२२२/नवि-२०, दि.१०/१/२०१२ अन्वये आपल्याला कळविण्यात आले आहे की, महिला व बाल विकास विभागासाठी महानगरपालिकेच्या बजेटमध्ये ५ टक्केची तरतूद राखीव ठेवण्यात यावी व त्यामधून जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमासाठी लागणाऱ्या खर्च भागविण्यात यावा.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये लाभार्थींना त्यांच्या निवास स्थानापासून शासकिय/ निमशासकिय रुग्णालयामध्ये वाहतुकीसाठी तसेच घरपोहच परतीच्या प्रवासाकरीता वाहनाची सोय महानगरपालिकेने करावी. महानगरपालिका कार्यक्षेत्रा बाहेरील लाभार्थींना मोफत वाहतुकीची सोय जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या मार्फत करण्यात येईल यासाठी आपल्या मॅटरनिटी होम/ रुग्णालय स्तरावरील एका अधिकाऱ्याची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करावी ज्याने जिल्हा शल्य चिकित्सक तसेच जिल्हा स्तरीय कॉल सेंटरशी दैनंदिन / नियमीत संपर्क साधून लाभार्थींना मोफत वाहतुकीची व्यवस्था करावी.

महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये प्रसुत झालेल्या मातांना किमान ३ दिवस मोफत आहाराची सोय करावी. प्रसुती नंतर सदरहू मातांना किमान ३ दिवस रुग्णालयामध्ये राहण्याबाबत समुपदेशन करावे. ज्या मातांचे सीझेरीयन शस्त्रक्रियेव्दारे प्रसुती झाली आहे. अशांना ७ दिवस मोफत आहाराची सोय करावी.

गरोदर मातांना तसेच ३० दिवसा आतिल आजारी नवजात बालकांना आवश्यक त्या प्रयोगशाळा चाचण्या, सोनोग्राफी व क्ष-कीरण तपासण्या व रक्त पुरवठा मोफत उपलब्ध करुन दयावा.

जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमाची व्यापक प्रसिध्दी महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये आय.ई.सी. अंतर्गत उपलब्ध अनुदानातून करण्यात यावे.

जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत सादर करावयाचे अहवालाचे नमुने सोबत जोडण्यात आले आहेत, सदरचे अहवाल नियीमतपणे या कार्यालयास तसेच उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळ यांचेकडे सादर करावे.

Dhanande

**अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा,**
**राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.**

**प्रत माहितीसाठी –**

१) आयुक्त महानगरपालिका ...............(सर्व)
२) उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळ .........(सर्व)
३) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय ठाणे, नाशिक, धुळे, जळगांव, अहमदनगर, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, औरंगाबाद, परभणी, लातूर, नांदेड, अकोला, अमरावती, नागपूर.

**प्रत सविनय सादर,**

आयुक्त (कुक) तथा संचालक राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई

d/karnataki/Marathi letter

महाराष्ट्र शासन
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
DIRECTORATE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH
Govt.Dental College & Hospital Building, St.George's Hospital Compound, Mumbai - 400 001.
Tel.No. +91-22-22620361-65/22652257/59 Telegram:" MEDUCATNSEARCH"
Fax:+91-22-22620562/22652168 Website :http://www.dmer.org

परिपत्रक / अतितात्काळ
क्र.संवैशिवसं/एनआरएचएम/प्रवनबा-निशुल्कसेवा/४-अ, दिनांक : ३०/०५/२०११

प्रति,
अधिष्ठाता,
सर्व अधिष्ठाता

विषय : प्रसुती व नवजात बालकांना निःशुल्क उपचार व मोफत संदर्भ सेवा पुरविणेबाबत.

संदर्भ : स्वास्थ एवं परिवार कल्याणमंत्री मा. श्री. गुलाम नबी आझाद , भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मा. मुख्यमंत्री महोदयांना अग्रेषित इंग्रजी पत्र क्र. D.O.Dy.No 376/2011-HFM, Dated 18 Feb.2011

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भीय पत्राची प्रत सोबत जोडली आहे. सदरपत्रात आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये गरोदर माता व नवजात बालकांना मोफत औषधोपचार देण्याबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर सेवेमध्ये मोफत औषधोपचार, आहार व इतर अनुषंगीक सेवेचा समावेश आहे. शासकीय रुग्णालयात येणा-या सर्व गरोदर स्त्रियांना (दारिद्रय रेषेखालील व व त्या वरील) आवश्यक प्रसुतीपुर्व तपासण्या, औषधोपचार, बाळंतपणाच्या सुविधा, प्रसुतीपाश्चात सेवा पूर्णपणे मोफत उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. नवजात बालकांना ( जन्मानंतर २८ दिवसापर्यंत) रुग्णायलयात किंवा घरी जन्माला आल्यानंतर कोणत्याही कारणांस्तव रुग्णालयात भरती केल्यानंतर त्याना लागणारा औषधोपचार व सर्व वैद्यकीय सेवा मोफत उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

वरिल मोफत वैद्यकीय सेवेबाबत सविस्तर बाब केंद्र शासनाच्या संदर्भीय पत्रामध्ये नमुद केलेली आहे. सदर पत्रात नमुद बाबींचे काटेकोर पालन आपल्या रुग्णालयात तात्काळ करावेत व आपण केलेल्या कार्यवाहीची माहिती या संचालनालयास सादर करावी.

संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :
१) मा. अतिरिक्त मुख्य सचिव, सर्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय,मुंबई
३) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.